नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६३ Issue - 163 | वार - रविवार दि. ८ नोव्हेंबर २०२६ Blow- Sunday Date 8 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

अयोध्येत दीपोत्सवाचा भव्य सोहळा! ३० लाख दिव्यांनी उजळली रामनगरी

पारंपरिक दिव्यांच्या साथीने लेझर शोचेही आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अयोध्या/रामनगरी : अयोध्येमध्ये सध्या भव्य दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. संपूर्ण शहर दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाले असून, या सोहळ्याची दृश्ये मनमोहक आहेत. यंदाच्या दीपोत्सवासाठी तब्बल तीस लाख दिवे लावण्यात आले आहेत, ज्यामुळे अयोध्या नगरीचे सौंदर्य कैक पटीने वाढले आहे. या दीपोत्सवाचा परिसर दिव्यांनी पूर्णपणे उजळून निघाला आहे. पारंपरिक दिव्यांच्या साथीने लेझर शोचेही आयोजन करण्यात आले आहे, जे प्रकाशाच्या या सोहळ्याला एक आधुनिक आणि आकर्षक किनार देत आहे.



लेझर लाईट्स आणि दिव्यांच्या लखलखाटाने अयोध्या नगरी जणू स्वर्गाहून सुंदर भासत आहे. विशेषतः शरयू नदीच्या तीरावर करण्यात आलेली दिव्यांची भव्य रोषणाई आकर्षणाचे केंद्र बनली आहे. या दीपोत्सवात केवळ अयोध्येतील नागरिकच नव्हे, तर बाहेरून आलेल्या असंख्य भाविकांनी आणि पर्यटकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आहे. तीस लाख दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघालेली अयोध्या नगरी लक्ष लक्ष दिव्यांनी उजळून निघाली आहे, ज्यामुळे हा दीपोत्सव एक अविस्मरणीय अनुभव देत आहे.

देशवासीयांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिवाळीच्या शुभेच्छा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : दिवाळीच्या शुभमुहूर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशाला आणि जगभरातील भारतीयांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. या मंगलमयी सणानिमित्त देशवासीयांच्या आयुष्यात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि शांतता लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी केली. पंतप्रधानांनी सोशल मीडियावर एका खास व्हिडिओ संदेशाद्वारे देशवासीयांशी संवाद साधत हा सण सर्वांच्या आयुष्यात नवीन प्रकाश घेऊन येवो, असा विश्वास व्यक्त केला.

'हा सण म्हणजे अंधकारावर विजय मिळवण्याचा निर्धार'

आपल्या संदेशात पंतप्रधान मोदी म्हणाले की, दिवाळीचा हा सण आणि येणारा आगामी काळ तुमच्या सर्वांच्या आयुष्यात भरपूर आनंद, सुख-शांती आणि आर्थिक प्रगती घेऊन येवो. दिवाळी हा केवळ घराबाहेर दिवे लावण्याचा सण नसून, तो आपल्या मनातील, जीवनातील आणि समाजातील अज्ञानाचा व निराशेचा अंधकार दूर करण्याचा सण आहे. हा प्रकाशोत्सव आपल्याला सकारात्मकतेकडे जाण्याची प्रेरणा देतो आणि अंधाराविरुद्ध खंबीरपणे उभे राहण्याचा आपला संकल्प अधोरेखित करतो, असा संदेश त्यांनी दिला.

यंदाही जवानांसोबत साजरी करणार दिवाळी

दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई नाही, तर अंधारावर मात करणारा संकल्प!'



पंतप्रधानांनी आपल्या संदेशात एका अत्यंत खास परंपरेचा आवर्जून उल्लेख केला. देशाच्या सीमांचे अहोरात्र रक्षण करणाऱ्या भारतीय सैनिकांसोबत दिवाळी साजरी करण्याची त्यांची सवय आणि आवड त्यांनी पुन्हा एकदा व्यक्त केली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मी आपली दिवाळी देशाच्या शूर जवानांसोबत साजरी करणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कडक उन्हात, बर्फाच्छादित पर्वतांवर आणि प्रतिकूल परिस्थितीत देशवासीयांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या जवानांचे मनोबल वाढवणे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

देशाच्या जवानांच्या पाठीशी संपूर्ण देश खंबीर

पंतप्रधान मोदी २०१४ मध्ये सत्तेत आल्यापासून दरवर्षी दिवाळीचा सण सैनिकांसोबत सीमावर्ती भागात जाऊन साजरा करतात.

देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांमुळेच संपूर्ण देश आनंदाने सण-उत्सव साजरे करू शकतो. त्यामुळे पंतप्रधान जेव्हा जवानांमध्ये जाऊन त्यांना मिठाई भरवतात आणि त्यांच्यासोबत वेळ घालवतात, तेव्हा संपूर्ण देश जवानांच्या पाठीशी उभा आहे असा संदेश मिळतो. ही परंपरा केवळ औपचारिक नसून देशाच्या सैन्याशी जोडलेला एक अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी बंध आहे, असेही त्यांनी नमूद केले.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी मुख्यमंत्री अन् महसूल मंत्री बावनकुळेंचा मुक्काम!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या प्रत्येक मंत्र्याने शेतकऱ्याच्या घरी मुक्काम करत तिथेच जेवण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री स्वतः नागपूर जिल्ह्यातील 'लोहारी सावंगा' गावात 'रामभाऊ बालपांडे' यांच्या घरी मुक्कामी राहिले, तिथेच जेवले. तर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे (उहरपवीरीहशज्ञहरी इुरपर्ज्ञीश्रश) लोहारी सावंगा गावात (डे-हरीळ डर्रीरपसर र्ीिळश्रश्ररसश) 'नंदुजी लोहे' या शेतकऱ्याच्या घरी मुक्कामी राहिले. मात्र, काही कारणांनी लोहे यांच्या घरातील स्वयंपाकाला उशीर झाला. मुख्यमंत्री यांच्या जेवणानंतर शेतकऱ्यांसोबत संवादाची वेळ झाली, मात्र तोवर बावनकुळे यांचे जेवणच झाले नव्हते.



अशातच, काही कार्यकर्त्यांनी बावनकुळे यांना दुसऱ्या घरात जेवण करण्याचा सल्ला दिला. मात्र बावनकुळे यांनी कितीही उशीर झाला, तरी ज्या शेतकऱ्याने घरी राहायला जागा दिली, त्याच शेतकऱ्याच्या घरी जेवणार, त्या शेतकऱ्याचा स्वाभिमान दुखावणार नाही, अशी भूमिका घेतली. अखेर शेतकरी संवादाचा कार्यक्रम सुरू झाला. बावनकुळे त्यात न जेवताच सहभागी झाले. शेतकरी संवादाचा कार्यक्रम संपवून सर्व शेतकऱ्यांचे तक्रार अर्ज स्वीकारून, त्यासंदर्भात अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देऊन बावनकुळे पुन्हा नंदूजी लोहे यांच्या घरी पोहोचले. तोवर सव्वा अकरा वाजले होते. अखेर बावनकुळे यांनी साडे अकरा वाजता लोहे कुटुंबीयांसोबत जेवण करत साधेपणाने दिवाळी साजरी केली. ज्या शेतकऱ्याने प्रेमाने घरी राहण्यास परवानगी दिली, मान दिला, त्या शेतकऱ्याच्या घरी जेवणाला तास दोन तास उशीर झाला तरी त्या शेतकऱ्याची भावना महत्वाची आहे, अशी भूमिका बावनकुळे यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांसोबत थंडीत शेकोटीचा आनंद घेत साधला संवाद

दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लोहारी सावंगा गावात मुक्कामी असताना रात्री उशिरा शेकोटीचा आनंद घेत, स्थानिक शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिवाळी निमित्त लोहारी सावंगा गावात असताना त्यांच्यासोबत नागपुरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सुद्धा एका शेतकऱ्याच्या घरी मुक्कामी राहिले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसोबत थंडीत शेकोटीचा आनंद घेतला.

दुष्काळग्रस्त शेतकरी पोपट सावंत यांच्या घरी मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची दिवाळी भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (जिमाका) : मुख्यमंत्री यांनी जाहीर केल्यानुसार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगोला तालुक्यातील इटकी येथील शेतकरी पोपट गोविंद सावंत यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांसमवेत दिवाळी साजरी केली.



अग्रीम मदतीअंतर्गत पाच हजार रुपये खात्यावर जमा; शेतकरी कुटुंबाशी साधला संवाद

यावेळी मंत्री श्री. भोसले यांनी सावंत कुटुंबीयांना दिवाळीचा फराळ व आहेर देत शुभेच्छा दिल्या. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता धैर्याने परिस्थितीचा सामना करावा, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जाहीर केलेल्या अग्रीम आर्थिक मदत योजनेअंतर्गत पोपट गोविंद सावंत यांच्या बँक खात्यात पाच हजार रुपये जमा करण्यात आले आहेत. याबद्दल सावंत यांनी समाधान व्यक्त केले.

पोपट सावंत यांच्या कुटुंबात तीन सदस्य असून त्यांच्या नावे १ हेक्टर २६ आर शेतजमीन आहे. या क्षेत्रात मका व बाजरी पिकांची लागवड करण्यात आली होती. पर्जन्यमानातील तुटवड्यामुळे मक्याचे ०.५० हेक्टर व बाजरीचे ०.५० हेक्टर असे एकूण १ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. बाधित क्षेत्राचा पंचनामा पूर्ण करण्यात आला असून शासन निर्णयानुसार त्यांच्या खात्यावर अग्रीम आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे.

यावेळी मंत्री श्री. भोसले यांनी सावंत कुटुंबीयांशी संवाद साधून शेतीची सद्यस्थिती, पिकांचे नुकसान तसेच शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या मदतीबाबत माहिती घेतली. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेनुसार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी जाऊन दिवाळी साजरी करण्याच्या उपक्रमातून शासन शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी असल्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब देशमुख, तहसीलदार बाळूबाई भागवत, जिल्हा परिषदेचे आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



बौद्ध धम्मात दिवाळी साजरी करावी की, विवेकाचा दीप प्रज्वलित करावा?

परंपरेच्या अंधानुकरणापेक्षा इतिहासाचे भान, बुद्धांचा प्रकाश आणि बाबासाहेबांच्या विचारांशी प्रामाणिक राहणे हीच खरी धम्मनिष्ठा!





प्रवीण बागडे
साहित्यिक आणि सामाजिक
विश्लेषक, नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दिवाळी आली की सर्वत्र प्रकाशाचा उत्सव सुरू होतो. घराघरांत पणत्या उजळतात, आकाशात आतषबाजी होते, मिठाईची देवाणघेवाण होते आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. मात्र, या झगमगाटात एका मूलभूत प्रश्नाकडे आपण कधी गांभीर्याने पाहिले आहे का? आपण तथागत गौतम बुद्धांचा धम्म स्वीकारला आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक क्रांतीचा वारसा अभिमानाने मिरवतो, मग बौद्ध समाजाने दिवाळी नेमकी कोणत्या विचाराने आणि कोणत्या धार्मिक संकल्पनेतून साजरी करावी? हा प्रश्न कुणाच्या श्रद्धेला दुखावण्यासाठी नाही, तर स्वतःच्या वैचारिक भूमिकेचा प्रामाणिक शोध घेण्यासाठी आहे. कारण धम्म म्हणजे केवळ उपासना नव्हे, तर विचार, आचार आणि विवेकाची जीवनपद्धती आहे.

दिवाळीचा इतिहास हा एकाच धार्मिक कथेत किंवा एका ऐतिहासिक घटनेत सामावलेला नाही. भारतीय उपखंडात या सणाशी विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक परंपरा जोडल्या गेल्या आहेत. हिंदू परंपरेत रामाच्या अयोध्येतील आगमनाशी दिवाळीचा संबंध जोडला जातो. काही परंपरांमध्ये लक्ष्मीपूजन, नरकासुरवध, बळीराजा आणि इतर पौराणिक कथांशी तिचे नाते सांगितले जाते. जैन परंपरेत भगवान महावीरांच्या निर्वाणाशी दीपावलीचा संबंध आहे, तर शीख परंपरेत बंदी छोड दिवसाला विशेष महत्त्व आहे. म्हणजेच दिवाळीचे स्वरूप विविध धार्मिक आणि सांस्कृतिक प्रवाहांतून विकसित झाले आहे. मात्र, दिवाळी ही बौद्ध धम्माची अनिवार्य धार्मिक परंपरा आहे किंवा तथागत बुद्धांनी ती साजरी करण्याचा उपदेश केला आहे, असा ठोस ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे इतिहास, आख्यायिका, श्रद्धा आणि वास्तव यांची सरमिसळ न करता प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे.

तथागत गौतम बुद्धांनी मानवाला अंधश्रद्धेच्या अंधारातून बाहेर काढून प्रज्ञा, शील आणि करुणेचा मार्ग दाखवला. त्यांनी कोणत्याही गोष्टीचा स्वीकार केवळ परंपरा आहे म्हणून करू नका, तर तिची चिकित्सा करा, अनुभवातून सत्य तपासा आणि विवेकाच्या कसोटीवर उतरल्यासच स्वीकारा, असा विचार मांडला. बौद्ध धम्मातील प्रकाश हा केवळ पणतीचा किंवा दिव्याचा प्रकाश नाही. तो अज्ञानावर ज्ञानाचा, द्वेषावर मैत्रीचा, हिंसेवर करुणेचा आणि विषम तेवर समतेचा विजय आहे. एखाद्या घरात शेकडो दिवे लावले, पण त्या घरातील माणसांच्या मनात जातीय अहंकार, द्वेष, अस्पृश्यता आणि भेदभावाचा अंधार कायम असेल, तर त्या प्रकाशाला काय अर्थ उरतो? बुद्धांचा संदेश स्पष्ट आहे. माणसाने स्वतःच्या मनातील अज्ञान दूर केले पाहिजे. दुसऱ्याच्या दुःखात सहभागी झाले पाहिजे. सर्व जीवांविषयी मैत्री आणि करुणा बाळगली पाहिजे. म्हणूनच बौद्ध धम्मात खऱ्या अर्थाने प्रकाशपर्व साजरे करायचे असेल, तर ते प्रज्ञेचे, करुणेचे आणि समतेचे असले पाहिजे.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. ही घटना केवळ धर्मांतर नव्हती, तर हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेविरुद्ध उभारलेली वैचारिक आणि मानवी मुक्तीची ऐतिहासिक क्रांती होती. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा या धर्मांतराचा आत्मा आहेत. या प्रतिज्ञांमधून त्यांनी हिंदू धर्मातील विशिष्ट देवदेवतांवरील श्रद्धा, कर्मकांड, पूजा-पाठ आणि धार्मिक विधी यांचा त्याग करण्याचा स्पष्ट संकल्प अनुयायांकडून करवून घेतला. राम, कृष्ण, ब्रह्मा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही, त्यांची पूजा करणार नाही, तसेच हिंदू धर्मातील धार्मिक विधी करणार नाही, अशा प्रतिज्ञांचा त्यात समावेश आहे. महत्त्वाचा मुद्दा असा की या २२ प्रतिज्ञांमध्ये 'दिवाळी' या सणाचा स्वतंत्रपणे उल्लेख नाही. त्यामुळे दिवाळी साजरी करणारा प्रत्येक बौद्ध व्यक्ती प्रतिज्ञाभंग करतो, असा सरसकट निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र, दिवाळी साजरी करताना आपण कोणत्या धार्मिक श्रद्धा, देवपूजा किंवा कर्मकांड स्वीकारत आहोत, याचा विचार करणे अत्यावश्यक आहे. बाबासाहेबांनी धर्मांतर करून केवळ नाव बदलले नव्हते, तर विचार बदलण्याचा आणि जीवनपद्धती बदलण्याचा संदेश दिला होता. मग त्यांच्या प्रतिज्ञा केवळ दीक्षाभूमीवर सामूहिकरीत्या उच्चारण्यासाठी होत्या की त्या रोजच्या जीवनात उतरवण्यासाठी? हा प्रश्न प्रत्येक बौद्ध अनुयायाने स्वतःला विचारला पाहिजे.

भारतीय समाजात सण हे केवळ धार्मिक नसतात, तर त्यांना सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक स्वरूपही असते. त्यामुळे बौद्ध व्यक्तीने दिवाळीत कुटुंबीयांसोबत आनंद साजरा करणे, घराची स्वच्छता करणे, मित्रपरिवाराला शुभेच्छा देणे, गोडधोड वाटणे किंवा गरजूंच्या जीवनात आनंद निर्माण करणे यात कोणताही वैचारिक विरोधाभास असण्याची आवश्यकता नाही. परंतु लक्ष्मीपूजन, पौराणिक देवतांची पूजा, विशिष्ट धार्मिक कर्मकांड आणि त्यामागील श्रद्धा स्वीकारताना बाबासाहेबांच्या प्रतिज्ञांचे भान ठेवणे आवश्यक आहे. सांस्कृतिक आनंद आणि धार्मिक अधिष्ठान यांमधील फरक समजून घेतला पाहिजे. धम्म स्वीकारल्यानंतरही जर आपण पूर्वीच्या धार्मिक कर्मकांडांचे अंधानुकरण करत असू, तर धर्मांतराचा वैचारिक अर्थ आपण समजून घेतला आहे का, हा प्रश्न निर्माण होतो. दुसरीकडे, केवळ दिवाळीत पणती लावणाऱ्या किंवा सामाजिक आनंदात सहभागी होणाऱ्या व्यक्तीला धम्मद्रोही ठरवणेही बुद्धांच्या विवेकवादी शिकवणीशी सुसंगत नाही. दिवाळी साजरी करणे आणि हिंदू धार्मिक कर्मकांड स्वीकारणे यात फरक आहे!

आज बौद्ध समाजासमोर सर्वांत मोठे आव्हान केवळ धार्मिक ओळख टिकवण्याचे नाही, तर बाबासाहेबांनी दिलेली वैचारिक ओळख अधिक समृद्ध करण्याचे आहे. समाजात शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा यांचा प्रसार करणे ही खरी धम्मसेवा आहे. दिवाळीच्या निमित्ताने हजारो रुपये फटाक्यांवर खर्च करण्याऐवजी एखाद्या गरीब विद्यार्थ्याच्या शिक्षणाला मदत केली, वंचित कुटुंबाच्या घरात अन्नधान्य पोहोचवले, वृद्धांना आधार दिला, निराधार मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले, तर तो प्रकाश अधिक अर्थपूर्ण ठरणार नाही का? बुद्धांनी करुणेचा मार्ग दिला आणि बाबासाहेबांनी स्वाभिमानाचा. या दोन्ही विचारांचा संगम आपल्या कृतीत दिसला पाहिजे. धम्म म्हणजे केवळ बौद्ध असल्याचा अभिमान नव्हे, तर आपल्या आचरणातून माणूसपण सिद्ध करण्याची जबाबदारी आहे. धम्म म्हणजे द्वेष नव्हे, तर प्रज्ञा आणि करुणा! शेवटी प्रश्न दिवाळीचा नाही, तर आपल्या वैचारिक प्रामाणिकपणाचा आहे!


बौद्धांनी दिवाळी साजरी करावी की करू नये, याचे उत्तर कोणत्याही व्यक्तीच्या दबावातून किंवा सामाजिक बहिष्काराच्या भीतीतून मिळणार नाही. ते उत्तर इतिहासाच्या अभ्यासातून, बुद्धांच्या तत्त्वज्ञानातून आणि बाबासाहेबांच्या २२ प्रतिज्ञांच्या प्रामाणिक आकलनातून मिळाले पाहिजे. आपण दिवाळी साजरी करणार असू, तर ती कोणत्याही अंधश्रद्धेच्या अधीन न राहता सामाजिक सलोखा, मैत्री, करुणा आणि माणुसकीचा उत्सव म्हणून साजरी करू शकतो. मात्र, त्याचवेळी आपल्या धम्मपरंपरेची आणि वैचारिक भूमिकेची गल्लत होऊ देता कामा नये. कारण घराच्या उंबरठ्यावर पणती लावणे सोपे आहे; परंतु मनातील जातीयतेचा अंधार दूर करणे कठीण आहे. फटाके फोडून आकाश उजळवणे सोपे आहे, परंतु समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे धैर्याचे काम आहे. बाबासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करणे सोपे आहे, परंतु त्यांच्या विचारांनुसार जगणे ही खरी कसोटी आहे.

आपल्याला केवळ दिव्यांचा प्रकाश हवा आहे की विचारांचा प्रकाश? आपल्याला केवळ सणांचा आनंद हवा आहे की समतेने नटलेला समाज? लक्षात ठेवा, बाबासाहेबांनी आपल्याला केवळ धर्म दिला नाही, तर स्वाभिमानाने जगण्याची दृष्टी दिली. बुद्धांनी आपल्याला केवळ श्रद्धा दिली नाही, तर सत्य शोधण्याचा विवेक दिला. म्हणूनच दिवाळीच्या झगमगाटात एक गोष्ट विसरता कामा नये, दिवा लावण्यापेक्षा विचार जागवणे महत्त्वाचे, परंपरा पाळण्यापेक्षा सत्य तपासणे महत्त्वाचे आणि धर्माची आळख सांगण्यापेक्षा माणुसकीचे आचरण करणे महत्त्वाचे! हीच तथागत बुद्धांच्या धम्माची खरी शिकवण आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन करण्याची खरी पद्धत!

दीपावली : दिव्यापासून दिवा पेटवावा मानवाने!

दीपोत्सवाचा प्रकाश नव्हे, तर माणुसकीचा संदेश मनामनांत पोहोचावा!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



दीपावली... भारतीय संस्कृतीतील आनंद, उत्साह, परंपरा आणि मांगल्याचा पवित्र उत्सव! हा सण केवळ घराघरांत दिवे लावण्याचा नाही, तर माणसाच्या मनातील अज्ञान, द्वेष, मत्सर, अहंकार आणि नकारात्मक विचारांचा अंधार दूर करण्याचा संदेश देणारा आहे.

घर अन् मन पवित्र करणारा सण,
अज्ञानाच्या अंधाराला दूर सारणारा सण;
प्रेमाच्या तेलाने माणुसकीचा दीप
उजळणारा,
संस्कृती आणि सद्विचारांची शिकवण
देणारा सण!

जलदेवतेप्रती कृतज्ञता व्यक्त
करणारा सण,
ज्येष्ठांचा आदर आणि सन्मान
जपणारा सण;
शेणालाही सुंदर रूप देऊन अंगण
सजवणारा,
पूर्वजांच्या परंपरा आणि संस्कृतीचा
वारसा जपणारा सण!

भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याची गोडी
वाढवणारा सण,
वामन देवाच्या पूजेतून भक्तिभाव
जागवणारा सण;
बळीराजाच्या स्मृतींना उजाळा देणारा,
एका दिव्यापासून दुसरा दिवा पेटवण्याची
प्रेरणा देणारा सण!

दिव्यांच्या प्रकाशात आनंदाचे
क्षण फुलवणारा सण,
रंगीबेरंगी रांगोळ्यांनी अंगण
सजवणारा सण;
अवघे गाव नववधूप्रमाणे नटवणारा,
नाती, आपुलकी आणि माणुसकीची
वीण घट्ट करणारा सण!

माणुसकीचा दीप
पेटवूया!
दिवा लावूया केवळ घरात
नव्हे, तर मनामनांतही,
प्रेमाचा प्रकाश पसरवूया
प्रत्येकाच्या जीवनातही;
एका दिव्याने दुसरा दिवा
पेटत राहावा,
माणुसकीचा प्रकाश
अखंड जगात पसरत
राहावा!

आज समाजात माणसामाणसांमध्ये वाढणारा द्वेष, मत्सर, भेदभाव आणि अहंकार दूर करण्याची खरी गरज आहे. दीपावलीच्या निमित्ताने आपण एक संकल्प करूया की, कोणाच्याही आयुष्यात अंधार निर्माण करण्याऐवजी त्याच्या जीवनात आशेचा एक छोटासा दिवा बनूया.

एखाद्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे, गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे, दुःखी माणसाला आधार देणे, ज्येष्ठांचा आदर करणे आणि समाजात प्रेम, बंधुता व समानतेची भावना रुजवणे, हाच खऱ्या अर्थाने दीपावलीचा उत्सव आहे.

कारण दिवा स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देतो. त्याचप्रमाणे माणसानेही स्वतःच्या चांगल्या विचारांनी, कृतीने आणि माणुसकीने इतरांचे जीवन उजळवले पाहिजे.

खरा दीप तोच, जो स्वतः प्रकाशमान होऊन दुसऱ्यांचे जीवनही उजळवतो!

चला तर मग, या दीपावलीत केवळ पणत्या पेटवू नका, तर माणुसकीची ज्योतही प्रज्वलित करा. मनातील अंधार दूर करून प्रेम, आपुलकी, समता आणि बंधुतेचा प्रकाश सर्वत्र पसरवूया.

दिव्यापासून दिवा पेटवूया,
माणसामाणसांत माणुसकीचे नाते
जोडूया! सर्वांना दीपावलीच्या मंगलमय
आणि हार्दिक शुभेच्छा!

लेखन : निंगप्पा निंबाळ, दुधनी

पो.नि.अभिजीत सोनवणे यांची धडाकेबाज कामगिरी

सराईत मोटरसायकल चोरट्यास चांदवड पोलिसांनी केली अटक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



निफाड/प्रतिनिधी : चांदवड येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातून रात्री आठ विस च्या दरम्यान सौरभ महेंद्र मुथा रा. चांदवड यांची मोटरसायकल क्रमांक एम एच १५ ,जी.एस ६९ ३१ ही दुचाकी चोरीस गेली होती. सदर घटनेची माहिती चांदवड पोलीस ठाण्यात देण्यात आली असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता

सदर गुन्ह्याचे तपास अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित यांनी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिलेल्या होत्या. त्या सूचनाप्रमाणे चांदवड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अभिजीत सोनवणे, पोलीस हवालदार सचिन राऊत पोलीस अंमलदार प्रदीप आजगे, प्रदीपसिंग सोळंकी, विक्रम बस्ते, भूषण साळवे यांचे पथक राहुड घाटात पेट्रोलिंग करत असताना एक जण राखाडी रंगांची विनानंबर यूनिकॉर्न मोटारसायकल

भरधाव वेगाने चालवून घेऊन जात होता. हॉटेल स्वामी प्राईड येथे सदर मोटार सायकल चालक यास थांबवून त्याच मोटसायकल चे पेपर बाबत विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने त्यास पोलीस ठाणे येथे आनून चौकशी केली त्याने त्याचे नाव- तौहीद अहमद एजाज अहमद अन्सारी वय-३० वर्षे रा. हरून अन्सारी नगर शहाबान मज्जित जवळ शहाबानपुरा मालेगाव असे सांगितले असून त्यांच्या सदर मोटार सायकल मालकीबाबत सखोल चौकशी करता त्याने सदर मोटसायकल त्याचा साथीदार नाव - साहिद उर्फ काल्या पूर्ण नाव माहिती नाही रा. मालेगाव जिल्हा नाशिक असे सांगितले यांनी नामको बँक समोर कृषी उत्पन्न बाजार समिती चांदवड येथून मोटारसायकल चु चोरी केली या बाबत कबुली दिली. त्यास सदर गुन्ह्यात अटक करू मा. न्यायालय, चांदवड येथे हजर केले आहे. पोलीस निरीक्षक अभिजीत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हाचा पुढील सविस्तर तपास पोलीस हवालदार सचिन राऊत हे करत आहेत.

दिवाळी लक्ष्मीपूजनानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या अन्नछत्रास किराणा साहित्याची देणगी

नांदेड येथील श्री. अर्जुन हनुमंत पिंगळे यांचा सेवाभावी उपक्रम; सुमारे ९१ हजार रुपयांचे किराणा साहित्य अर्पण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



प्रतिनिधी/पंढरपूर : दीपावली २०२६ मधील लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या अन्नछत्रासाठी नांदेड येथील भाविक श्री. अर्जुन हनुमंत पिंगळे यांनी सुमारे रुपये ९१,०००/- मूल्याचे किराणा साहित्य देणगी स्वरूपात अर्पण केले.

श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांना अन्नछत्राच्या माध्यमातून भोजनप्रसाद उपलब्ध करून देण्याचे कार्य मंदिर समितीमार्फत केले जाते. या सेवाभावी उपक्रमास हातभार लावण्याच्या उद्देशाने श्री. पिंगळे यांनी दिवाळीच्या मंगलमय पर्वावर किराणा साहित्याची देणगी दिली. सणासुदीच्या काळात अन्नदानासारख्या पवित्र सेवेसाठी दिलेल्या या योगदानामुळे अन्नछत्राच्या कार्यास निश्चितच मदत होणार आहे. मंदिर समितीच्या वतीने श्री. अर्जुन हनुमंत पिंगळे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या खेळाडूची जलतरण ५० मी बटर फ्लाय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

सोलापूर/प्रतिनिधी : विभाग स्तरीय जलतरण ५० मी बटर फ्लाय स्पर्धेमध्ये वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्याचे अभूतपूर्व कामगिरी करत यश संपादन केले आहे. क्रीडा विभागातर्फे आयोजित विविध वयोगटातील शालेय जलतरण स्पर्धांमध्ये १९ वर्षाखालील मुलाच्या गटात ओमराजे अविनाश पाटील हयाने तृतीय क्रमांक पटकवला.

जलतरण स्पर्धेसाठी आवश्यक एकाग्रता आणि शारीरिक समतोल याबाबत क्रीडा शिक्षिक वैभव चौधरी, मनीष संपागे, पल्लवी पाटील व ऋषिकेश गावडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

रेशन दुकानात साखर, तेल, डाळीचा पत्ताच नाही

दुष्काळात शेतकरी होरपळला; आनंदाचा शिधा गायब

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

औसा प्रतिनिधी /अमर जाधव सारणीकर

दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले तेच मुजरांच्या हाताला काम नाही महागाईने सामान्यांचे जगणे कठीण झाले अशा संकटाच्या काळात गोरी गरीबांच्या दिवाळीचा गोडवा देणाऱ्या शासनाचा व आनंदाचा शिधा यंदा मात्र गायब झाल्याचे चित्र आहे दसरा दिवाळीच्या सणासुदीत रेशन दुकानावर साखर तेल दाळ रवा उपलब्ध नसल्याने गरीब कुटुंबाच्या पदरी निराशा पडली आहे दुष्काळात होळप णाऱ्या जनतेला दिलासा देण्याऐवजी शासनाने आनंदाचा शिधा रोखला आहे का? असावा संतप्त सवाल औसा तालुक्यातील जनतेला पडला आहे

गेल्या दोन वर्षापासून शासनाकडून दिवाळीपूर्वी शंभर रुपयात आनंदाचा शिधा दिला जात होता या किटमध्ये एक किलो साखर एक लिटर तेल एक किलो चणाडाळ आणि एक किलो रवा अशा वस्तूचा समावेश होता या अल्पदरातील किटमुळे कुटुंबियांना दिवाळीचा फराळ तयार करण्यासाठी हातभार लागत होता

दिवाळी सण चालू झालं तरी आनंदाचा



शिधा वाटप बाबत शासनाकडून स्पष्ट आदेश नसल्याचे राशन दुकानदार सांगत आहेत तेव्हा यंदा हा शिधा मिळणार की नाही याबाबत लाभार्थ्यांमध्ये संभ्रम आहे गरीब कुटुंबासाठी महत्त्वाचा ठरलेला योजनेचे पुढे काय होती याचे उत्तर मात्र मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे

औसा तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामाला फटका बसला आहे शेतकऱ्याचे उत्पन्न घटले असून शेतमजुरांनाही पुरेसा रोजगार मिळत नसल्याची परिस्थिती आहे

एकीकडे हाताला काम नाही तर दुसरीकडे जीवनाशक वस्तूंचे दर वाढले आहेत साखरेचा दर किलोमागे पन्नास रुपये यावर तर खाद्यतेलांचा दर १६० रुपये च्या पुढे गेला आहे सामान्य कुटुंबांच्या खर्चात भर पडले आहे अशा परिस्थितीत फराळीच करायचं की कसं अशी परिस्थिती उद्भवली आहे

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने यंदा दिवाळीचा शिधा दुप्पट करावा अशी अपेक्षा होती मात्र नियमित शिधा मिळत नसल्याने गोरगरिबांच्या सणाला आनंदाची विरजण पडले आहे रेशन दुकानदाराला शिधा कधी वाटप आहे विचारले असता अद्याप परेंत तर आदेश नाही असे सांगण्यात आले. लाभार्थ्यांचे प्रतिक्षा वाढले आहे दुष्काळाने चुल पेठवणे कठीण झाले असून दिवाळीच्या गोडवा देणाऱ्या शिधा गायब झाल्याने गोरगरिबांनी सण साजरा करायचा तरी कसा असा प्रश्न औसा तालुक्यातील नागरिकांना पडला आहे.

पुरवठा अधिकाऱ्यांना विचारले असता अद्याप परेंत शिधा आलेला नाही आल्या नंतर कळवण्यात येईल असे सांगण्यात आले

– दिलीप भालेराव(राशन दुकानदार सारणी)

वागदरी येथे वर्षावास व ग्रंथ वाचन समारोप समारंभ संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



वागदरी/एस. के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे वर्षावास व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखितबुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथ वाचन समारोप समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

भारतीय बौद्ध महासभा, पंचशील बुद्ध विहार कमिटी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व बी. आर. तरुण मंडळ वागदरी च्या वतीने आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा या तिन महिन्याच्या कालावधीमध्ये वर्षावासाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या तीन महिन्यात भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन करण्यात आले होते.

दि.५ नोव्हेंबर २२६ रोजी या वर्षावास व ग्रंथ वाचन कार्यक्रमाचा समारोप समारंभाचे आयोजन येथील पंचशील बुद्ध विहारत करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा वागदरीच्या अध्यक्षा कविता गायकवाड ह्या होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष्या राजश्रीताई कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे तुळजापूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बनसोडे, सेवानिवृत्त पोलीस हवालदार संदिपान वाघमारे, श्राम णेर चंद्रकांत वाघमारे,सदन शेतकरी तथ सामाजिक कार्यकर्ते अमोल गोगावे आधी होते.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून सामुदायिकरित्य बुद्ध वंदना घेण्यात आली.या प्रसंगी बोलताना राजश्रीताई कदम म्हणाल्या की बौध्द धम्म हा शांतीच्या आणि अहिंसेच्या मार्गाने आपण आपलें जिवन व्यवस्थित करायला सागतो. त्यामुळेच तथागत भगवान गौतम बुध्दानी मानवाला पंचशील तत्वाचे पालन करण्याचा उपदेश दिलेलाआहे.तर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बनसोडे म्हणाले की रक्तपात करून हजारो युध्द जिंकण्या पेक्षा एकच कुशल कर्म करून समाधानाने जिवण जगण्याचा संदेश भगवान गौतम बुध्द देतात तेंव्हा प्रत्येकाने त्यांच्या विराचे अनुकरण केले पाहिजे व आठवड्यातून एक वेळेस बुद्ध विहारात गेले पाहिजे

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोमल झंडारे यानी केले.तर सुत्रसंचलन व अभार प्रदर्शन एस.के.गायकवाड यानी केले. या वेळी कुंडलिक वाघमारे, अनिलं वाघमारे,कल्लाप्पा वाघमारे, शिवाजी वाघमारे, बाळू दादा वाघमारे,दिपक वाघमारे,मुकेश धाडवे,

वैभव वाघमारे, उज्वला वाघमरे, गीताबाई झेंडारे, ठकुबाई वाघमारे, कमलबाई धाडवे, श्रीदेवी वाघमारे, कमळाबाई वाघमारे, स्वाती गायकवाड, मुक्ताबाई वाघमारे, जिजाबाई वाघमारे सिंमिताबाई वाघमारे, रेखाबाई झेंडारे सह महिला, ग्रामस्थ, युवा कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.



९–१६ नोव्हेंबर:राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन सप्ताह.

कायदेशीर सेवा : नागरिकांना त्यांचे मूलभूत हक्क बहाल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन- छरींळेपरश्र डशसरश्र डर्शींळलशी ऊू दरवर्षी दि. ९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे सर्व नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि विशेषत: आर्थिदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांसाठी न्यायप्रविष्ट होण्याच्या मार्गात असलेल्या अडचणी दूर करणे होय. भारताच्या संविधानानुसार प्रत्येक नागरिकाला न्याय मिळणे हे मूलभूत हक्क आहे, परंतु अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे गरीब वर्गासाठी न्याय मिळवणे कठीण होते. सदर मार्गदर्शक संकलित लेख दिनविशेषकार- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींची प्रस्तुती जी... संपादक.

राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिनाच्या निमित्ताने, विविध कायदा सेवा प्राधिकरणे व न्यायालये मोफत कायदेविषयक सल्ला, तक्रारींचे निवारण आणि जनजागृती अभियान राबवतात. या दिवसाचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता वाढवणे आणि न्याय व्यवस्थेत त्यांचा विश्वास वाढवणे होय. आपल्या भारतामध्ये दरवर्षी दि.९ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन- छरींळेपरश्र डशसरश्र डर्शींळलशी ऊू म्हणून साजरा केला जातो.

मुख्य माहिती आणि इतिहास: स्थापना व सुरुवात: हा दिवस सन १९९५ पासून साजरा करण्यास सुरुवात झाली. दि.९ नोव्हेंबर १९९५ रोजी ''कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा-१९८७ (डशसरश्र डशी-ींळलशी ींहीळींळशी लीं, १९८७) प्रत्यक्ष अमलात आला. उद्देश: समाजातील गरीब, दुर्बल, वंचित, महिला, अनुसूचित जाती-जमाती आणि दिव्यांग घटकांना मोफत, सक्षम व त्वरित कायदेविषयक मदत मिळावी तसेच न्याय प्रक्रियेत सर्वांना समान संधी असावी, यासाठी जनजागृती करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. छडड ची भूमिका: या कायद्यांतर्गत नॅशनल लीगल सर्व्हिसेस अथॉरिटी, छडड - राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. छडड द्वारे देशभरात मोफत कायदेशीर सल्ला, वकील पुरवणे आणि ''लोकअदालत''चे आयोजन केले जाते.

या दिवसाचे महत्त्व: १ समान न्याय: संविधानातील कलम ३९ नुसार नागरिकांना मोफत कायदेशीर मदत आणि समान न्याय मिळावा या तत्त्वावर हा दिवस आधारित आहे. २ जनजागृती: सामान्य नागरिकांना त्यांचे कायदेशीर अधिकार, कायदेविषयक योजना आणि विवाद निवारण पद्धतींची (उदा. लोकअदालत) माहिती दिली जाते. ३ अधिकृत माहिती आणि मोफत कायदेशीर मदतीसाठी आपण महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

इतिहास: दि.९ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय विधी-कायदेशीर सेवा दिन, भारतीय विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ च्या अंमलबजावणीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. बऱ्याच देशांमध्ये मध्यस्थी आणि कायदेशीर सेवांसारखे विनामूल्य कायदेशीर सेवा उपक्रम सामान्यतः अव्यवस्थित असतात, मागणी अभावी किंवा ग्राहकांच्या गर्दीमुळे ते बंद होतात. लोक अदालत, मध्यस्थी आणि मोफत कायदेशीर मदत यांसारख्या पर्यायी विवाद निराकरण पद्धती तयार करण्यात आल्या आहेत; तथापि प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी कोणतेही विशेष कायदे लागू करण्यात आलेले नाहीत. दि.११ ऑक्टोबर १९८७ रोजी कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा १९८७ लागू करण्यात आला. हा कायदा दि.९ नोव्हेंबर १९९५ रोजी अंमलात आला. भारताचे राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण-छडड दि.५ डिसेंबर १९९५ रोजी त्याच्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आले. छडड ने गरजू लोकांना मोफत कायदेशीर मदत आणि सल्ला देणे, मध्यस्थी आणि सलोख्याने समझोता करून प्रकरणांचा निपटारा करणे यासह विविध उपक्रम हाती घेतले. भारतीय न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार (बॅकलॉग) कमी करण्यासाठी तसेच गरजू पक्षकारांना न्याय मिळवून देण्यासाठी हा एक अनोखा प्रयत्न होता. या प्रसंगाचे स्मरण म्हणून, कायद्याच्या अंमलबजावणीचा दिवस १९९५ मध्ये प्रथमच ''राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन'' म्हणून साजरा करण्यात आला. प्रत्येक राज्याचे कायदेशीर सेवा प्राधिकरण राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरील संस्थांमार्फत या दिवसाचे आयोजन करतात.

उत्सव: कायदेशीर सेवा प्राधिकरण कायद्यांतर्गत असलेल्या विविध तरतुदी आणि पक्षकारांच्या हक्कांविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी कायदेशीर सेवा दिन साजरा केला जातो. प्रत्येक अधिकारक्षेत्र लोक अदालती, कायदेशीर मदत शिबिरे आणि कायदेशीर मदत कार्यक्रम आयोजित करते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!!! राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

– संकलन व सुलेखन –

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.

(दिनविशेषकार)

राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.

अक्कलकोट तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या ६६ व्या वर्षात पदार्पण; तज्ञ संचालकपदी सिद्धाराम चौधरी सर यांची सर्वानुमते निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेने आज आपल्या ६६ व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्त संस्थेची मासिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत संस्थेच्या कामकाजासह विविध विषयांवर साधक-बाधक चर्चा करून संस्था व शिक्षक सभासदांच्या हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय संचालक मंडळाकडून घेण्यात आले.



शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष आदरणीय श्री. वीरभद्र यादवाड सर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक संघाची संघटनात्मक वाटचाल सुरू असताना, या सभेत सोलापूर जिल्हा कन्नड शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री. सिद्धाराम चौधरी यांची तज्ञ संचालकपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच संस्थेचे आर्थिक व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी धनादेशावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार संचालिका सौ. राजश्री सोलापुरे यांना सर्वानुमते प्रदान करण्यात आला.

याशिवाय, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी नूतन संचालक म्हणून निवड झालेल्या श्री. सिद्धाराम पुजारी व श्री. सतीश पाटील यांचा संस्थेच्या वतीने शाल, फेटा, पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री. बसवराज खिलारी व संचालक सवळी सर यांच्या हस्ते करण्यात आला.

तज्ञ संचालकपदी निवड झाल्याबद्दल श्री. सिद्धाराम चौधरी यांचा सत्कार संस्थेचे संचालक श्री. गुरुशांत मगी यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच धनादेशावर स्वाक्षरीचा अधिकार मिळाल्याबद्दल सौ. राजश्री सोलापुरे यांचा सत्कार श्री. बसवराज खिलारी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी संस्थेचे चेअरमन श्री. शंकर आजगोंडे, तज्ञ संचालक श्री. संगमेश येळेगाव, श्री. मल्लिनाथ चनपटणे, श्री. परमेश्वर किणगे, केंद्रप्रमुख शांतमल्लय्या स्वामी, श्री. प्रकाश पाटील, श्री. सचिन पाटील, श्री. धर्मराज गिरी, श्री. मारुती हन्नुरे, श्री. शिवानंद पाटील आदी शिक्षक व संचालक उपस्थित होते.

संस्थेच्या ६६ व्या वर्षातील वाटचालीस शुभेच्छा देतानाच नवनियुक्त तज्ञ संचालक व नूतन पदाधिकाऱ्यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले. संस्थेची प्रगती, पारदर्शक कारभार आणि सभासदांचे हित जोपासण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

धन्वंतरी जयंती व धनत्रयोदशीचे औचित्य साधून सांगोल्यातील ५० हून अधिक डॉक्टरांचा सन्मान

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख

दुष्काळात गरजू रुग्णांना मोफत किंवा अल्पदरात उपचार द्यावेत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/सांगोला - रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून सामाजिक बांधिलकीतून रुग्णांना नवसंजीवनी देणाऱ्या सांगोला तालुक्यातील डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पुढाकाराने विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. धन्वंतरी जयंती व धनत्रयोदशीचे औचित्य साधून आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या या सोहळ्यात सांगोला तालुक्यातील ५० हून अधिक डॉक्टरांचा शाल, गुलाबपुष्प व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख मेडिकल फॅक्लटी आणि रोटरी क्लब ऑफ सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने



या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख हे स्वतः हृदयरोगतज्ज्ञ असून त्यांच्या पत्नी डॉ. निकिताताई बाबासाहेब देशमुख या स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. वैद्यकीय क्षेत्राशी असलेले त्यांचे नाते आणि भगवान धन्वंतरी जयंतीचे औचित्य साधून श्री. अरुण पाटील व डॉ. निरंजन केदार यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला तालुक्यातील डॉक्टरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात वैद्यकशास्त्र व आरोग्याची आद्य देवता भगवान धन्वंतरी यांच्या पूजनाने आणि धन्वंतरी स्तवनाने झाली. सांगोल्यातील ज्येष्ठ डॉक्टर कै. डॉ. श्रीकांत भोसेकर यांच्या द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त उपस्थित सर्व डॉक्टरांच्या वतीने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख आणि रोटरी क्लब ऑफ सांगोला यांच्या वतीने उपस्थित डॉक्टरांचा शाल, गुलाबपुष्प व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. निकिताताई बाबासाहेब देशमुख, ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. प्रभाकर माळी, डॉ. अमरसिंह शेंडे, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. माणिक भोसले तसेच रोटरी क्लबचे सदस्य अनिल इंगवले यांनी मनोगत व्यक्त केले. डॉक्टरांचे वैद्यकीय क्षेत्रातील योगदान आणि समाजाप्रती असलेल्या सेवाभावी वृत्तीचे यावेळी कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय बंडगर यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. निरंजन केदार यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ डॉक्टर डॉ. मच्छिंद्र सोनलकर, डॉ. अनिल कांबळे, डॉ. शिवराज भोसले, डॉ. रणजीत केळकर, डॉ. महेश राऊत, डॉ. संतोष पिसे, डॉ. एच. व्ही. गावडे, डॉ. दत्तात्रेय इंगोले, डॉ. ढाळे, डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. राजाराम लवटे, डॉ. बसवेश्वर पाटील, डॉ. कोमल कांबळे, डॉ. विनायक डमकले, डॉ. उषा देशमुख, डॉ. अभयसिंह देशमुख, डॉ. फिरोज तांबोळी, डॉ. अभिजीत सोनलकर, डॉ. शैलेश डोंबे, डॉ. प्रमोद बोराडे, डॉ. सचिन गवळी, डॉ. विजय इंगवले, डॉ. प्रवीण पैलवान, डॉ. अजित नवले, महादेव कोळेकर, डॉ. विवेकानंद विभुते, डॉ. सारिका लवटे, डॉ. सुनील लवटे, डॉ. प्रज्ञा लवटे, डॉ. अमर जाधव, डॉ. किरण जगताप, डॉ. सैफुल तांबोळी, डॉ. विनोद केदार, डॉ. सुपर्णा केळकर, डॉ. मुल्ला, डॉ. शिंगण, डॉ. धनंजय गावडे, डॉ. महावीर आलदर, डॉ. पटेल (कोळा) यांच्यासह ५० हून अधिक डॉक्टर उपस्थित होते.

तसेच रोटरी क्लब ऑफ सांगोलाचे अध्यक्ष, सचिव व सर्व सदस्य आणि आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख मेडिकल फॅक्लटीचे सदस्य उपस्थित होते.

दुष्काळात गरजू रुग्णांना आरोग्यसेवा देण्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे आवाहन

यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी तालुक्यातील सर्व डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सध्या तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून या परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवा मिळवताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे येणाऱ्या वर्षात गोरगरीब, गरजू रुग्णांसह सर्व नागरिकांना शासकीय योजनांच्या माध्यमातून मोफत किंवा अत्यल्प दरात आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी डॉक्टरांनी सहकार्य करावे. सामाजिक बांधिलकी जपत आपल्या परीने गरजू नागरिकांना जास्तीत जास्त मदत करावी.

शून्यातून विश्व निर्माण करणारे, मातीशी नाळ जपणारे आणि आईच्या प्रेमापोटी आधुनिक श्रावणबाळ ठरलेले व्यक्तिमत्त्व : मधुकर सुरवसे!



गोंगावचे सुपुत्र उद्योगपती श्री. मधुकर सुरवसे साहेब यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

काही माणसे आपल्या कर्तृत्वाने मोठी होतात, तर काही माणसे आपल्या स्वभावाने आणि माणुसकीने सर्वांच्या मनात अढळ स्थान निर्माण करतात. अशाच बहुआयामी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे अक्कलकोट तालुक्यातील गोंगावचे सुपुत्र, पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक श्री. मधुकर सुरवसे साहेब!

नावाप्रमाणेच मधुर स्वभाव आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व ही त्यांची खरी ओळख आहे. कुठलीही मोठी व्यावसायिक पार्श्वभूमी नसताना केवळ जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि कष्टाच्या जोरावर त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. पुण्यात बांधकाम व्यावसायिक म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही आपल्या गावाशी, मातीशी आणि माणसांशी असलेली नाळ त्यांनी कधीही तुटू दिली नाही. गोंगावच्या माणसांसाठी धावून जाण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या मोठ्या मनाची साक्ष देते.

आईवरील प्रेम म्हणजे आधुनिक श्रावणबाळ!

मधुकर सुरवसे साहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत भावणारी गोष्ट म्हणजे आईवरील त्यांचे अपार प्रेम आणि श्रद्धा! आईला आनंदी ठेवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न पाहिले की त्यांना आधुनिक काळातील श्रावणबाळ म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आईला विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घडविण्यापासून ते विमानाने देशभर प्रवास घडवून आणण्यापर्यंत त्यांनी आईच्या इच्छा पूर्ण करण्याला नेहमीच प्राधान्य दिले आहे. आईच्या चेहऱ्यावरील आनंदातच आपला आनंद शोधणारा हा मातृभक्त मुलगा खऱ्या अर्थाने कौतुकास पात्र आहे.

कुटुंबीयांवर जीवापाड प्रेम करणारे, मित्रपरिवाराशी जिव्हाळ्याचे संबंध जपणारे आणि प्रत्येकाशी आपुलकीने वागणारे मधुकर सुरवसे साहेब माणसे जोडण्याची अनोखी कला जाणतात.

सर्वपक्षीय राजकीय नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध!

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी एक महत्त्वाची जमेची बाजू म्हणजे सर्वपक्षीय राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी असलेले त्यांचे सलोख्याचे संबंध. कोणत्याही राजकीय पक्षाचा भेदभाव न करता सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध जपण्याची त्यांची हातोटी विशेष उल्लेखनीय आहे. त्यामुळेच सर्वच पक्षांतील नेत्यांना मधुकर सुरवसे आपलेसे वाटतात. राजकारणापलीकडे जाऊन माणुसकीचे आणि मैत्रीचे नाते जपणारे ते एक वेगळे व्यक्तिमत्त्व आहे.

व्यवसायात यश, सामाजिक क्षेत्रात आपुलकी, राजकीय क्षेत्रात मैत्रीपूर्ण संबंध, कुटुंबात प्रेम आणि आईच्या चरणी निस्सीम भक्ती अशा अनेक गुणांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पाहायला मिळतो.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासातील जिद्द, कर्तृत्व, माणुसकी आणि मातृप्रेमाला मनापासून सलाम!

मधुकर सुरवसे साहेब, आपणास वाढदिवसाच्या मनः पूर्वक शुभेच्छा!* आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि उदंड आनंद लाभो. आपल्या हातून अशीच समाजसेवा घडत राहो, आपल्या यशाचा आलेख उत्तरोत्तर उंचावत राहो आणि आपल्या चेहऱ्यावरील हास्य सदैव कायम राहो, हीच सदिच्छा!

शुभेच्छुक – धोंडपा नंदे
संपादक – गावगाथा
मीडिया नेटवर्क

पूर्वीची दिवाळी आणि आत्ताची दिवाळी काळ बदलला, दिवाळीचे स्वरूप बदलले!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

दिवाळी हा भारतीय संस्कृतीतील आनंद, उत्साह, मांगल्य आणि प्रकाशाचा सण आहे. पूर्वीची दिवाळी आणि आजची दिवाळी यांची तुलना केली, तर काळानुसार सणाचे स्वरूप बदलले असले, तरी दिवाळीमागील आनंद आणि आपुलकीची भावना आजही तितकीच महत्त्वाची आहे.

पूर्वीची दिवाळी साधेपणात समृद्ध होती. दिवाळीच्या अनेक दिवस आधी घरांची स्वच्छता, अंगणात सडा-रांगोळी, शेणाने सारवलेले अंगण, आकाशकंदील तयार करण्याची लगबग आणि फराळ बनवण्याचा सुगंध सर्वत्र दरवळत असे. आईच्या हातचे लाडू, चकल्या, करंज्या आणि अनारसे यांची चव काही औरच होती. पहाटेचा अभ्यंगस्नानाचा आनंद, नवीन कपडे, मातीचे दिवे आणि मित्रांसोबत फटाके फोडण्याचा उत्साह मनाला आनंद देत असे. नातेवाईकांच्या भेटीगाठी, शेजाऱ्यांमधील आपुलकी आणि एकमेकांच्या घरी फराळ देण्याची परंपरा यामुळे दिवाळी माणसांना जोडणारा सण होता.

आजची दिवाळी आधुनिकतेच्या रंगात रंगली आहे. आकर्षक विद्युत रोषणाई, बाजारातील विविध मिठाया, ऑनलाइन खरेदी आणि सोशल मीडियावरील शुभेच्छा यामुळे सणाचे स्वरूप बदलले आहे. मात्र, धावपळीच्या जीवनात प्रत्यक्ष भेटीगाठी, कौटुंबिक संवाद आणि एकत्रित आनंदाचे क्षण कमी होताना दिसतात. पर्यावरणाचे प्रदूषण आणि वाढता खर्च हीदेखील चिंतेची बाब आहे.

आज गरज आहे ती आधुनिकतेचा स्वीकार करताना परंपरेची जपणूक करण्याची. मातीचे दिवे लावूया, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करूया, गरजूंच्या जीवनात आनंदाचा प्रकाश पसरवूया आणि नात्यांमधील आपुलकी जपूया.

कारण, दिवाळीचे खरे सौंदर्य महागड्या रोषणाईत नसून माणसांच्या मनातील प्रेम, माणुसकी आणि आनंदात आहे.

शब्दांकन : प्राध्यापक रवींद्र गुलाबराव चाटे

प्राचार्य, महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय, लाखनवाडा.

प्रा. उल्हास पाटील हे 'शिक्षा शिखर पुरस्काराने सन्मानित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील प्रा. उल्हास पाटील तसेच श्रीराम क्लासेसच्या संचालिका सविता पाटील यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'शिक्षा शिखर पुरस्कार २०२६' अंतर्गत 'कोचिंग गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले,मुंबई गोरेगाव येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्र क्लास ओनर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा सन्मान करण्यात आला.



शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा गौरव; 'कोचिंग गौरव पुरस्कार' प्रदान

प्रा. उल्हास पाटील हे श्रीराम क्लासेस, निफाड आणि निफाड एज्युकेशन फाउंडेशन** यांच्या माध्यमातून शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रभावी मार्गदर्शन, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि शैक्षणिक नवकल्पना यांद्वारे त्यांनी शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

श्रीराम क्लासेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करत असतानाच, निफाड एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत विविध शैक्षणिक, जनजागृतीपर आणि समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, गुणवंतांचा गौरव करणे, शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे आणि समाजातील विविध घटकांपर्यंत शिक्षणाचे महत्त्व पोहोचविणे, अशा कार्यातून त्यांनी सामाजिक योगदान दिले आहे.त्याच्या या कार्याची

दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे

या पुरस्कारामुळे निफाडच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्राची मान उंचावली असून, त्यांच्या यशाबद्दल निफाड मित्रपरिवार, विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक आणि हितचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे

पंढरपूर कॉरिडॉर विरोधात बाधित नागरिक न्यायालयात जाण्याबाबत चर्चा!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर /प्रतिनिधी : राज्य सरकारचा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखला जाणाऱ्या पंढरपूर कॉरिडॉरच्या कामाला आता सुरुवात होण्याची हालचाली सुरू झाले आहेत. मंदिर परिसरातील कॉरिडॉरमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना जिल्हा प्रशासनाकडून भूसंपादनाच्या नोटीस बजावण्यात आले आहेत. येत्या १२ नोव्हेंबर पासून भक्तनिवास सुनावणी प्रक्रिया सुरू होणार आहे या प्रकल्पाला मंदिर परिसरातील संबंधित नागरिकांसह स्थानिक नगरसेवकांनी विरोध दर्शवला आहे या विरोधात न्यायालयीन लढा देण्याची तयारी नागरिकांनी सुरू केली असून विविध अधिकारी आणि विजेत्यांना सल्ला घेऊन पुढील कायदेशीर भूमिका ठरवण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

मंदिर परिसरातील प्रस्थापित कॉरिडॉर आणि त्यामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी काल पांडुरंग भवन येथे स्थानिक नगरसेवकांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती व या बैठकीला कॉर्डरमुळे बाधित होणाऱ्या मालमत्ता धारकांच्या अडचणी भूसंपादन प्रक्रिया पूर्वीचे विस्थापन आणि मिळालेल्या मोबदला अशा विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या तुळजापूर तालुका सरचिटणीस पदी सुरवसे यांची निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के.गायकवाड : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या तुळजापूर तालुका सरचिटणीस पदी लिंबाजीराव सुरवसे सर अणदूर यांची नियुक्ती करण्यात आली.

लिंबजीराव सुरवसे हे सराटी ता. तुळजापूर येथील रहिवासी असून त्यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन जवाहर विद्यालय अणदूर या ठिकाणी सहशिक्षक म्हणून नोकरीस लागले. नोकरी करत करतच त्यांनी स्वतःला सामाजिक कार्यात जोडून घेतले आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सराटी व परिसरात आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेहमीच सक्रिय राहतात. ते सध्या नोकरी



निमित्त अणदुर येथे वास्तव्य करून आहेत.सामाजिक राजकीय व धम्म चळवळीत त्यांचे मोठे योगदान आहे.नुकतच ते सेवानिवृत्ती झाले असून आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडत आंबेडकरी चळवळीत सक्रिय आहेत त्यांची समाजातील सर्व जाती धर्मातील लोकांमध्ये चांगले सलोख्याचे संबंध आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या पक्षाच्या तुळजापूर तालुका सरचिटणीस पदी त्यांची निवड करण्यात आली आहे.त्यांना सदर निवडीचे नियुक्तीपत्र सन्माननीय जिल्हाध्यक्ष तथा आमदार डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते देण्यात आले आहे या वेळी तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील ,ज्येष्ठ नेते अनिल (दादा) शिंदे, ज्येष्ठ नेते तथा नगरसेवक धनंजय काका पाटील, दिलीप नाना मगर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष तौफिक शेख,शहराध्यक्ष अमरनाना चोपदार ,युवक तालुकाध्यक्ष शरद जगदाळे, गणेश नन्नवरे ,शहाजी कसबे ,इब्राहिम इनामदार, सामाजिक कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी आदी उपस्थित होते.

स्वखर्चातून ५० कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २ हजार रुपयांची आर्थिक मदत; निफाड नगरपंचायतीच्या सर्व कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप करून जपली सामाजिक बांधिलकी!

माणुसकीचा दिवा पेटवत उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांच्याकडून ५० कंत्राटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फराळ, मिठाई आणि नवीन कपड्यांचा सण नव्हे, तर आपल्या आनंदात दुसऱ्यांनाही सहभागी करून घेण्याचा, त्यांच्या आयुष्यात सुखाचा आणि समाधानाचा प्रकाश पसरविण्याचा सण! याच भावनेचा प्रत्यय निफाडमध्ये आला असून, निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांनी आपल्या कृतीतून माणुसकीचा एक सुंदर आदर्श समाजासमोर ठेवला आहे.,

दिवाळीच्या आनंदापासून नगरपंचायतीत काम करणारा कोणताही कर्मचारी वंचित राहू नये, त्यांच्या घरातही आनंदाचा दिवा तेवावा आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही सणाचा गोडवा अनुभवता यावा, या संवेदनशील भावनेतून अनिल पाटील कुंदे यांनी स्वतःच्या खर्चातून निफाड नगरपंचायतीच्या सर्व कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप केले. एवढेच नव्हे, तर नगरपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या तब्बल ५० कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २ हजार रुपये याप्रमाणे एकूण १ लाख रुपयांची आर्थिक मदत देऊन त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.,

शहराच्या स्वच्छतेपासून विविध नागरी सुविधांपर्यंत अनेक जबाबदाऱ्या पार पाडणारे कंत्राटी कर्मचारी हे नगरपंचायतीच्या दैनंदिन कामकाजाचा महत्त्वाचा भाग आहेत. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता हे कर्मचारी आपले कर्तव्य बजावत असतात. मात्र, त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून सणासुदीच्या काळात त्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा विचार प्रत्येकाच्या मनात येतोच असे नाही. हीच जाणीव आणि संवेदनशीलता जपत अनिल पाटील कुंदे यांनी आपल्या वैयक्तिक खर्चातून या कर्मचाऱ्यांसाठी मदतीचा हात पुढे केला.,

विशेष म्हणजे, ही मदत कोणत्याही शासकीय निधीतून किंवा नगरपंचायतीच्या खर्चातून नसून, स्वतःच्या खिशातून करण्यात आलेली आहे. त्यामुळे या उपक्रमाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. कारण एखाद्याला आर्थिक मदत करणे ही एक गोष्ट असते; मात्र दुसऱ्याच्या घरातील दिवाळी आनंदाने साजरी व्हावी, त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलावे, अशी मनापासून इच्छा बाळगणे ही खऱ्या अर्थाने माणुसकी असते.,

दिवाळीच्या रोषणाईत स्वतःचे घर उजळविणारे अनेक असतात; पण दुसऱ्यांच्या घरात आनंदाचा दिवा पेटविणारे हात खऱ्या अर्थाने समाजाचे वैभव असतात!,

उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे यांनी केलेल्या या उपक्रमातून पद, प्रतिष्ठा आणि अधिकार यापलीकडे जाऊन माणसांशी जोडलेली नाळ किती महत्त्वाची असते, याची प्रचिती आली., कर्मचाऱ्यांच्या श्रमांचा सन्मान, त्यांच्या कुटुंबीयांच्या आनंदाची जाणीव आणि समाजातील प्रत्येक घटकाला सणाच्या आनंदात सहभागी करून घेण्याची भावना या उपक्रमातून व्यक्त झाली.,

कारण दिवाळीचा खरा आनंद फटाक्यांच्या आवाजात नसतो, तो एखाद्याच्या चेहऱ्यावर फुललेल्या हास्यात असतो. एखाद्याला दिलेल्या भेटवस्तूपेक्षा त्याच्या अडचणीच्या वेळी दिलेला आधार अधिक मोलाचा असतो.,

निफाड नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांसाठी राबविलेला हा उपक्रम केवळ दिवाळी भेट किंवा आर्थिक मदत नसून, कष्टकरी हातांप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीचा हृदयस्पर्शी आविष्कार ठरला आहे.,

स्वतःच्या आनंदात इतरांनाही सामावून घेणारी माणसेच खऱ्या अर्थाने सण साजरा करतात, आणि अनिल पा. कुंदे यांच्या या उपक्रमाने याच माणुसकीच्या दिवाळीचा सुंदर संदेश दिला आहे!,